# तुती

GVT कृषीकुल
अधिक माहितीसाठी संपर्क:
82 7373 3030/82 7373 3535

**पिकाचे नाव:** तुती
**शास्त्रीय नाव:** मोरस आल्बा (Morus alba)
**कुळ:** मोरासी (Moraceae)
**जात:** व्ही 1
**लागवड दिनांक:** 11/07/2023
**लागवड अंतर:** 6 x 2 फूट
**लागवड क्षेत्र:** 67 R
**रोपसंख्या:** 4100
**लागवंड योग्य अंतर:** 5x2x1, 6x2x1 फूट

**व्ही 1 जातीचे वैशिष्टे:** व्ही 1 जातीची मुख्य वैशिष्टे म्हणजे पाने जाड, रसाळ, मोठ्या, संपूर्ण आणि त्रिकोणी आकाराची, गुळगुळीत आणि चकचकीत आहेत. जलद वाढ आणि भरपुर पाला देणारी हि जात रसदार असून पानात 75% आद्रता आढळून येते, या जातीच्या पाल्याचे उत्पादन प्रति हेक्टरी 60,000 कि. ग्रॅम पर्यंत येते.
**तुतीचे गुणधर्म:** रेशीम शेती हा अनेक देशांतील महत्त्वाच्या उद्योगापैकी एक उद्योग आहे आहे. भारत आणि चीन हे जागतिक उत्पादनाच्या जवळपास 60% रेशीम उत्पादन करतात. तुतीच्या पानांच्या लागवडीला मोरीकल्चर असे म्हणतात, तुतीची पाने हेच रेशीम किड्यांचे अन्न आहे, तुतीच्या फळांमध्ये लोह, व्हिटॅमिन 'सी' आणि फॅटीअॅसिड हे मुबलक प्रमाणात आढळून येतात.
**माती:** माध्यम, भारी व हलकी पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन तुती लागवडी साठी योग्य ठरते. तुती लागवडी साठी जमिनीचा समू हा 6.5 ते 7 एवढा असावा. डोंगर उताऱ्याची खारट व पाणथळ जमीन लागवडी करता टाळावी.
**तापमान:** तुती लागवडी साठी थंड व उष्ण असे दोन्हीही प्रकारचे हवामान मानवते परंतु 25-30° c तापमान तुती रोपांच्या योग्य वाढीसाठी योग्य असून या हवामानात तुती पानांचे चांगले उत्पन्न मिळू शकते. तुती पानांच्या चांगल्या उत्पादनासाठी तुती लागवड 750 ते 1000 मिलि पावसाची गरज असते. महाराष्ट राज्याची कृषी विषयक हवमानाची परिस्थिति विचारात घेता पानांचे बारमाही उत्पादन होऊ शकते.
**उत्पादन:** प्रति हेक्टरी 60,000 कि. ग्रॅम पानांचे उत्पादन. (20000 to 24000 किलो/एकर/वर्ष पाने)
**तुतीवरील मुख्य कीड:** पिंक मिली बग, थ्रीप्स, पाने गुंडाळणारी आळी
**तुतीवरील मुख्य रोग:** बुरशीजण्य ठिपके, भुरी, करपा